**निवृत्तीवेतनधारक / कुटुंब निवृत्तीवेतनधारक यांच्या मृत्यूनंतर हयातकालीन थकबाकीचे प्रदान अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / कोषागार कार्यालयामार्फत नामनिर्देशित व्यक्तीस / व्यक्तींना अथवा कायदेशीर वारसदारास प्रदान करण्याच्या कार्यपध्दतीमध्ये सुधारणा करणेबाबत........**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०२५/प्र.क्र.६५/कोषा.प्रशा-५**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
**दिनांक :- ०७ एप्रिल, २०२६.**

**वाचा :**
१. मुंबई वित्तीय नियम, १९५९ मधील नियम क्र.७२
२. महाराष्ट्र कोषागार नियम १९६८, ३५९(१)(ब)
३. महालेखापाल कार्यालय, मुंबई यांचे अनौ.संदर्भ क्र.PM/Ch.३/ UOR/ ७०१२२५६१/८०१०१९८४, दिनांक-१० सप्टेंबर, २०२५.
४. महालेखापाल कार्यालय, मुंबई यांचे अनौ.संदर्भ क्र.Pension Misc./Ch.३/ UOR- ७०१३३७४५/८०१११३५७, दिनांक-०१ डिसेंबर, २०२५.

**<u>प्रस्तावना</u> :-**

निवृत्तीवेतनधारकाच्या / कुटुंबनिवृत्तीवेतनधारकाच्या मृत्यूनंतर निवृत्तीवेतनाच्या / कुटुंबनिवृत्तीवेतनाच्या हयातकालीन थकबाकीचे प्रदान महाराष्ट्र कोषागार नियम पुस्तिका, १९६८ मधील ३५९(१) (ब) नुसार त्याने नामनिर्देशित केलेल्या व्यक्तीला किंवा त्याच्या वारसाला त्याच्या मृत्यूनंतर एक वर्षाच्या आत त्यांनी अर्ज सादर केल्यासच देण्याबाबतची तरतूद आहे.

मुंबई वित्तीय नियम, १९५९ मधील नियम क्र.७२ अन्वये निवृत्तीवेतनधारकाच्या मृत्यूनंतर हयातकालीन थकबाकीचे प्रदान करणेसाठी वारसांकडून क्षतीपूर्ती बंधपत्र घेणे बंधनकारक आहे.

महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ मधील नियम क्र.३५९(अ ते ड) नुसार नामनिर्देशन देण्याबाबत तरतूद केलेली आहे. त्यानुसार एखाद्या निवृत्तीवेतनधारक / कुटुंबनिवृत्तीवेतनधारकाने मृत्यूपूर्वी नामनिर्देशन नमुना ४२-अ या नमुन्यामध्ये रितसर नामनिर्देशन केले नसल्यास अशा प्रकरणी वारसदारास न्यायालयाकडून वारसाहक्क प्रमाणपत्र (Succession Certificate) प्राप्त करुन घेऊन कोषागार कार्यालयास सादर करावे लागते.

वारसदारांना सदर नियमांबाबत माहिती नसल्यामुळे अर्ज विहित वेळेत सादर करण्यासाठी, क्षतीपूर्ती बंधपत्र, वारसाहक्क प्रमाणपत्र (Succession Certificate) प्राप्त करुन घेण्यासाठी कालापव्यय व आर्थिक बोजा वारसदारावर येतो. यामुळे महाराष्ट्र कोषागार नियम-१९६८ नियम क्र.३५९(१) (ब), मुंबई वित्तीय नियम,१९५९ मधील नियम क्र. ७२ च्या तरतूदींमध्ये सुधारणा करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते. त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**<u>शासन निर्णय :-</u>**

१. महाराष्ट्र कोषागार नियम-१९६८ नियम क्र. ३५९(१) (ब) मधील १ वर्षाची अट शिथिल करण्यात येत असून ती ५ वर्षे करण्यात येत आहे. नामनिर्देशित वारसदाराने हयातकालीन थकबाकी मिळणेसाठी अर्ज अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / कोषागार कार्यालयास करणे आवश्यक आहे.

२. नामनिर्देशित वारसदाराने निवृत्तीवेतनधारक / कुटुंबनिवृत्तीवेतनधारकाच्या मृत्यूच्या दिनांकापासून ५ वर्षांच्या आतमध्ये अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / कोषागार कार्यालयास अर्ज सादर केल्यास हयातकालीन थकबाकी रक्कम परिगणना करून अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / कोषागार कार्यालयांनी त्यांच्या स्तरावर रक्कम प्रदान करणेबाबत कार्यवाही करावी.

३. नामनिर्देशित वारसदाराने निवृत्तीवेतनधारक / कुटुंबनिवृत्तीवेतनधारकाच्या मृत्यूच्या दिनांकापासून ५ वर्षांनंतर अर्ज सादर केल्यास अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / कोषागार कार्यालयाने अशा प्रकरणी हयातकालीन थकबाकीची मागणी अमान्य करुन तसे संबंधित वारसदारास कळवावे.

४. महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ मधील नियम क्र. ३५९ (अ ते ड) नुसार नामनिर्देशन देण्याबाबत तरतूद केलेली आहे. त्यानुसार एखाद्या निवृत्तीवेतनधारक / कुटुंबनिवृत्तीवेतनधारकाने मृत्यूपूर्वी नामनिर्देशन नमुना ४२-अ या नमुन्यामध्ये रितसर नामनिर्देशन केले असल्यास अशा प्रकरणी निवृत्तीवेतनधारक / कुटुंबनिवृत्तीवेतनधारकाच्या मृत्यूनंतर नामनिर्देशित व्यक्तीस मुंबई वित्तीय नियम, १९५९ मधील नियम क्र. ७२ अन्वये क्षतीपूर्ती बंधपत्र भरून देण्याची आवश्यकता नाही. तसेच नामनिर्देशन नसलेल्या प्रकरणी वारस प्रमाणपत्र प्राप्त झालेल्या वारसदारास/ वारसदारांना क्षतीपूर्ती बंधपत्र भरून देण्याची आवश्यकता नाही.

५. निवृत्तीवेतनधारक / कुटुंबनिवृत्तीवेतनधारक यांनी कोषागार कार्यालयात नामनिर्देशन केलेले नसल्यास अशा प्रकरणी हयातकालीन थकबाकी रक्कम रुपये एक लाखापेक्षा कमी असल्यास अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / कोषागार कार्यालयाने त्यांच्या स्तरावर खालील कागदपत्राच्या आधारे हयातकालीन थकबाकी रक्कम प्रदान करण्याबाबत कार्यवाही करावी.

अ) तहसीलदार यांच्याकडून प्राप्त झालेले वारस प्रमाणपत्र

ब) निवृत्तीवेतनधारक / कुटुंबनिवृत्तीवेतनधारक ज्या कार्यालयातून सेवानिवृत्त झाले आहेत, त्या कार्यालयाकडून कार्यालय प्रमुख / आहरण व संवितरण अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेले कुटुंब तपशील प्रमाणपत्र

क) निवृत्तीवेतनधारक / कुटुंबनिवृत्तीवेतनधारक हे हयात असताना केलेले नामनिर्देशन / मृत्यूपत्र (will) वारसदाराने उपलब्ध करुन दिल्यास त्याबाबत वारसदारांचे रक्कम मिळणेबाबत स्वयंघोषणा प्रतिज्ञा पत्र

वरीलपैकी कोणत्याही एका प्रमाणप्रत्राच्या आधारे वारसदाराकडून बँक पासबुक, आधार कार्ड, पॅन कार्ड, उपलब्ध असल्यास शिधापत्रिका (रेशनकार्ड) या कागदपत्रांची छायांकित प्रत प्राप्त करुन घेऊन हयातकालीन थकबाकी रक्कम संबंधित वारसदार यांना प्रदान करण्याबाबत कार्यवाही करावी.

६. हयातकालीन थकबाकी रक्कम रुपये एक लाखा पेक्षा जास्त असेल तसेच वारसदार यांच्याकडून मुददा क्रमांक ५ मधील प्रमाणपत्र नसल्यास अथवा हयातकालीन थकबाकी रक्कम प्रदान करताना वारसदार यांच्यामध्ये वाद असतील अश्या प्रकरणी न्यायालयाकडून प्राप्त झालेले वारसाहक्क प्रमाणपत्राच्या (Succession Certificate) आधारे रक्कम प्रदान करण्याबाबत कार्यवाही करावी.

७. महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ मधील नियम क्र. ३५९ (२) नुसार हयातकालीन थकबाकी रक्कम प्रदान करताना निवृत्तिवेतनधारकाचा निवृत्तीवेतन प्रदान आदेशाचा भाग (Pensioner PPO Copy) वारसदाराकडे उपलब्ध असल्यास घ्यावा. संबंधित वारसदाराकडे निवृत्तीवेतन प्रदान आदेशाचा भाग (Pensioner PPO Copy) नसल्यास तसे संबंधित वारसदाराकडून लिखित स्वरुपात घेऊन रक्कम प्रदान करण्याबाबत कार्यवाही करावी.

८. महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ मधील नियम क्र. ३५९ (३) नुसार कुटुंब निवृत्तीवेतन ज्यांना लागू आहे, अशी प्रकरणे वगळून निवृत्तीवेतन प्रदान आदेशाचा भाग (PPO Copy) आणि हयातकालीन थकबाकी रक्कम वारसदार यांना प्रदान केल्याबाबतच्या माहिती सहित निवृत्तीवेतन प्रदान आदेशाचा भाग (PPO Copy) अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / कोषागार कार्यालयाने संबंधित महालेखापाल कार्यालयास परत पाठवावा.

९. वरीलप्रमाणे करण्यात आलेल्या सुधारणा यापूर्वी वारसदारांनी अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / कोषागार कार्यालयात अर्ज सादर केलेल्या अथवा सुरू असलेल्या प्रकरणीसुध्दा लागू राहतील.

१०. प्रस्तुत शासन निर्णयास अनुसरुन महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ व मुंबई वित्तीय नियम, १९५९ मध्ये समुचित सुधारणा यथावकाश करण्यात येतील.

प्रस्तुत शासन निर्णय, मा. महालेखापाल कार्यालय, मुंबई यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र. Pension Misc./Ch.३/ UOR- ७०१३३७४५/८०१११३५७, दिनांक-०१ डिसेंबर, २०२५ अन्वये प्राप्त झालेल्या मान्यतेस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०२६०४०७१७३१२३८३०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by RAVIKUMAR BALAJIRAO LINGANWAD
Date: 2026.04.07 17:32:41 +05'30'

**(रविकुमार लिंगनवाड)**
**शासनाचे उप सचिव**

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव.
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव.
३. मा.उप मुख्यमंत्री (नगर विकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम विभाग (सार्वजनिक उपक्रम)) यांचे प्रधान सचिव.
४. मा. उप मुख्यमंत्री (वित्त, नियोजन, व राज्य उत्पादन शुल्क) यांचे सचिव.
५. सर्व मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
६. मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई.
७. सर्व सन्माननीय विधान सभा / विधान परिषद व संसद सदस्य.
८. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग.
९. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांच्या अधिनस्त असलेले सर्व विभाग प्रमुख, प्रादेशिक कार्यालय प्रमुख व कार्यालय प्रमुख.
१०. प्रबंधक, मूळ शाखा, उच्च न्यायालय, मुंबई.
११. प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)- १, महाराष्ट्र, मुंबई.
१२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई.
१३. महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.
१४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.

१५. आयुक्त, आयकर (TDS) चर्नीरोड, मुंबई ४००००२.
१६. आयुक्त, आयकर (TDS) सिव्हील लाईन*, नागपूर ४४४००१.
१७. प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा) मुंबई.
१८. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
१९. सचिव, महाराष्ट्र विधीमंडळ सचिवालय, मुंबई.
२०. प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
२१. प्रबंधक,महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,मुंबई.
२२. मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२३. विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली.
२४. सर्व विभागीय आयुक्त.
२५. सर्व जिल्हाधिकारी.
२६. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
२७. संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२९. प्रादेशिक सह संचालक,लेखा व कोषागारे,कोकण / पुणे / नाशिक / छत्रपती संभाजीनगर / अमरावती / नागपूर.
३०. संचालक,स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई.
३१. प्रादेशिक सह संचालक,स्थानिक निधी लेखापरीक्षा कोकण / पुणे / नाशिक / छत्रपती संभाजीनगर / अमरावती / नागपूर.
३२. वरिष्ठ जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे / पुणे / नाशिक / छत्रपती संभाजी नगर / अमरावती / नागपूर.
३३. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
३४. वित्त विभागातील सर्व कार्यासने.
३५. निवड नस्ती कोषा. प्रशा.-५.